# मेरा भारत महान है !

लेखक - प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

अमेरिकेतील बहुतांश भारतीय मायभूमीच्या ओढीने भारताला भेट देतात. आपल्या नातेवाईकांच्या, मित्रांच्या आदरातिथ्याच्या अतिरेकाला कंटाळून परत जातात. भारतातील गर्दी, उष्ण, दमट हवामान आणि जागोजागी दिसणारे घाणीचे, दारिद्र्याचे दर्शन पाहून परत भारताला जाणे नको असेच मनाशी ठरवून जातात. गृहिणी स्वयंपाकघरातील कामांना आणि मोलकरणींच्या लहरी सेवेला कंटाळतात. तरूण मंडळी रस्त्यावरील बेशिस्त वहातूक आणि बेजबाबदार वागणूक पाहून ड्रायव्हिंग करायला घाबरतात. हॉटेलमधील चमचमीत पदार्थ जिभेला आवडतात पण पोटाला रुचत नाहीत आणि कुठलेही पाणी प्याले तरी लगेच पोट आणि पचनशक्ती बंड करून उठते. या सर्व अनुभवांमुळे भारत मेरा महान म्हणण्यापेक्षा 'भारत मेरा फारच घाण' असंच त्यांना वाटू लागते. हे सर्व खरंही आहे.

पण या चित्राला दुसरीही बाजू आहे. या भारतात याच हवामानात, पाण्यावर, अन्नावर जगणारी १०० कोटी माणसे आहेत. स्वयंपाकघरात सकाळ संध्याकाळ वर्षानुवर्षे राबणाऱ्या, मोलकरणींच्या मदतीसह किंवा शिवाय आपले कर्तव्य बजावणाऱ्या कोट्यावधी स्त्रिया आहेत. यापेक्षाही कदान्न खाणारी आणि घाणेरडे पाणी पिणारी असंख्य खेडवळ जनता आणि त्यांची अर्धनग्न मुले आहेत आणि हे सर्वजण आनंदात आहेत; विनातक्रार हे जीवन जगताहेत. यातीलच काही भारतीय अमेरिका इंग्लंडमध्ये असलेल्या आपल्या मुलांकडे किंवा नातेवाईकांकडे गेले तर ४/५ महिन्यांतच कंटाळतात व मायदेशी परतण्यासाठी आसुसतात, हेही सत्य आहे.

भारतीय जीवनाला नाके मुरडणारी परदेशातील पिढी किंवा त्यांचे पूर्वज हे याच भारतात जन्माला आले, वाढले. या भूमीतील शिक्षणाच्या पायावरच उशी मारून ते परदेशी यशस्वी झाले, कर्तबगार झाले. 'सिलिकॉन व्हॅली' तील बहुतांशी युवक युवती मुंबई पुण्यातील शाळा कॉलेजांत शिक्षण घेऊन मग अमेरिकेत गेले आहेत.

एकविसावे शतक हे भारताचे आहे. उगवती 'सुपर पॉवर' म्हणून सारे जग आज भारताकडे बोट दाखवते आहे. एक मोठी ग्राहकशक्ती म्हणून जगाचे सारे उद्योजक -- वाहनक्षेत्र असो वा दूरसंचार क्षेत्र, बांधकामक्षेत्र असो वा शिक्षणक्षेत्र -- भारतात कोट्यवधी रूपये गुंतवायला उत्सुक आहेत; कारखाने काढण्यासाठी अहमहमिका करतात, परदेशी वस्तूंचा वर्षाव करताहेत - याच दरिद्री, घाणेरड्या भारतावर; हे ही सत्य आहे.

भारतात वैद्यकीय सेवा अधिक चांगली आहे. येथील डॉक्टर्स आपापल्या क्षेत्रात वाकबगार आहेत असा लौकिक परदेशात पसरू लागला आहे. इंग्लंडपेक्षा भारतातील वैद्यकीय सेवा अधिक उच्च दर्जाची आहे म्हणून तेथील रूग्ण भारत पसंत करू लागले आहेत. फिजी बेटांचे अध्यक्ष कर्नल बाझुका भारतातील अहमदाबादमध्ये शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी आले. वेल्लोरच्या

हॉस्पिटलमधील डॉक्टर गांधींचे किडनी शस्त्रक्रियेतील कौशल्य पाहून अनेक धनिक परदेशी त्यांच्याकडे क्यूमध्ये उभे आहेत.
[Refer to the article 'Medical Tourism' in Seattle Post Intelligencer of July 24, 2006]

गोव्यातील एका हिंदू लग्नाला आपल्या मित्राच्या आग्रहाने हजर राहिलेले अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन तो लग्न सोहळा पाहून इतके खूष झाले की आपल्या एकुलत्या एक कन्येचा विवाह याच पद्धतीने व्हावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. भारताला भेट देणारे अनेक परदेशी पर्यटक राजस्थानातील राजेशाही विवाह पाहून खास लग्नासाठी भारतात येऊ लागले आहेत; हेही सत्य आहे.

भारताचा अध्यात्मिक वारसा हे तर भारताचे वैभव आहे. स्वामी विवेकानंद, आचार्य रजनीश, स्वामी महेश या परंपरेतच परवा एक भारतीय स्त्री 'मिठी मारणारी संत' [Hugging saint] अनेक अमेरिकनांना भारून गेली. तिच्या मिठीमध्ये 'शांतता व मुक्ती' देण्याचे अलौकिक सामर्थ्य आहे असे अनेक व्यक्तींनी 'Seattle Times' मध्ये जाहीर केले आहे.

बहुविधातली एकात्मता [unity in diversity] याचे भारत एक उत्तम, कदाचित एकमेव उदाहरण असेल. या खंडप्राय देशात सदैव हिमाच्छादित असणारी शिखरे आहेत तर अंगातून सतत घाम झिरपवणारी उष्णताही दक्षिणेकडे आहे. गगनचुंबी इमारतींची आकाशरेषा असणारी मुंबई कलकत्त्यासारखी शहरे आहेत व पाणी दुर्भिक्ष असणारी लक्षावधी खेडीही आहेत. गोऱ्या, गुलाबी कांतिचे, उंच देहयष्टीचे काश्मीरी, पंजाबी लोक आहेत आणि काळे, कृश, बुटके दक्षिणी आहेत. सर्व धर्मांची - हिंदु, मुस्लिम, इसाई, बौद्ध, जैन, ज्यू - जनता इथे गुण्यागोविंदाने नांदते आहे. हे ही जगातील एकमेव उदाहरण असेल. ताबुतात नाचणारे असंख्य हिंदु आहेत तर दसरा दिवाळी साजरी करणारे असंख्य मुस्लिम, ख्रिश्चन आहेत. निस्सीम एझेकिएल सारखा ज्यू कवी परदेशात नागरिकत्व मिळत असतानाही मुंबईत गर्वाने भारतीय म्हणून राहिला. गल्लीतला एखादा अशिक्षित शिंपीसुद्धा 'नेहरूंनी हे असं करायला नको होतं' अशी जाहीर टीका करू शकतो. उद्घोष न करताही भारतात सर्व प्रकारची स्वातंत्र्ये सर्व थरातील लोक अनुभवू शकतात. भारतीय गरीब असतील, मतदानाचे महत्व त्यांना कळत नसेल पण लोकशाहीची सर्व मूल्ये भारतात पाळली जात आहेत.

प्रचंड प्राचीन इतिहास असलेला भारत हा एकमेव देश आहे. सर्व क्षेत्रात भारताने महामानव निर्माण केले आहेत. विसाव्या शतकातला महामानव [man of the century] निवडताना असंख्य लोकांनी महात्मा गांधी या नावाचा पुरस्कार केला. अध्यात्मिक क्षेत्रात जगाला आपल्या नुसत्या संबोधनाने [Brothers and sisters of America] मोहित करणारे स्वामी विवेकानंद, अहिंसेने स्वातंत्र्य मिळवता येते हे सप्रयोग सिद्ध करणारे महात्मा गांधी, सर्वात अधिक श्रोते असलेल्या सभेचे अमोघ वक्ते जवाहरलाल नेहरू, वयाच्या केवळ १६व्या वर्षी प्रकांड विद्वानाना भुरळ पाडणारी ज्ञानेश्वरी लिहिणारे श्री ज्ञानेश्वर, United Nations ची पहिली स्त्री

अध्यक्षा विजयालक्षी पंडित, ३०,००० हुन अधिक गीते गाणारी लता मंगेशकर, उद्योगक्षेत्रात भारताला स्थान देणारे जमशेटजी टाटा, एवढेच काय पण पहिला सुपर संगणक निर्माण करणारे विजय भाटकर आणि पृथ्वीवरील जीवनाचे रहस्य उलगडणारे डॉ. नारळीकर - हे सर्व, लक्षात ठेवा भारतीय आहेत. अंकगणिताला 'शून्य' देणारे भास्कराचार्य भारतीय आहेत.

अध्यात्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारा भारत हळुह्ळू आधिभौतिक क्षेत्रातही उंच स्थान मिळवू लागला आहे. वस्त्रोद्योगातही [textile] भारताइतकी विपुलता आणि विविधता इतरत्र क्वचितच सापडेल. Miss Universe आणि Miss World हे मानही भारतीय स्त्रीने पटकावले आहेत. एक कोटीपेक्षाही अधिक मोबाईल फोन वापरणारा हा एकमेव देश असावा. माहितीतंत्र क्षेत्रात तर भारताने केलेली प्रगती जगजाहीर आहे.

पदवी मिळवताच एक कोटीहून अधिक पगार देणारी ऑफर काही भारतीय तरूणांना या वर्षी मिळाली आहे. हेव्याचा ताप नको म्हणून यातील काही तरूणांनी आपली नावे जाहीर केली नाहीत. सुवर्ण चौकोन [Golden Quadrilateral] नावाने गाजावाजा झालेली महारस्त्यांची [highway] योजना पूर्ण होते आहे व तिने हिंदुस्तानची चारही महानगरे - दिल्ली, मुंबई, चेन्नई व कोलकाता - ही रुंद चौपदरी रस्त्याने जोडली जात आहेत. ज्यांनी नुकतीच भारताला भेट दिली त्यांना उड्डाणपुलांनी बदललेले दिल्ली, मुंबई शहरांचे स्वरूप नक्कीच अभिमानास्पद वाटले असेल. मुंबईहून पुण्याला आता २ तासात येणे सहज शक्य झाले आहे.

उत्तरेतील पूर येणाऱ्या गंगा-यमुनेसारख्या नद्या, दक्षिणेतील गोदावरी कावेरी नद्याना जोडणारी Grand Canal व त्यातून भारतभर कालव्यांचे जाळे पसरविण्याची महत्वाकांक्षी योजना ठरल्याप्रमाणे वीस वर्षात पूर्ण झाली तर साऱ्या जगाला अन्नपुरवठा आणि दूधपुरवठा भारत करू शकेल आणि या शेतीला उद्योगधंद्यांची सहज जोड मिळून २०३० ते २०५० सालापर्यंत भारतात गरिबी हा शब्द शब्दकोशात सुद्धा सापडणार नाही; आणि हे सारे सत्य आहे. हे स्वप्नरंजन नाही; हे नजिकच्या भविष्यातील सत्य आहे; अगदी आपण 'याचि देही याची डोळा' पाहू असे सत्य आहे. मित्रांनो भारत बदलतो आहे, झपाट्याने बदलतो आहे, सुधारतो आहे, प्रगती करतो आहे. कोणत्याही भारतियाला भारताचा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ गर्व वाटेल असाच आहे. म्हणून भारत मेरा महान है.